क्र.२/नसचि/प्रशासक/ ०२/२०२३-२०२४
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका
दिनांक :- ०६ ऑक्टोबर २०२३

# सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

## सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक - ०२/२०२३-२०२४

## सभेची नोटीस

---

ज्या अर्थी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार विविध कामकाज पार पाडण्यासाठी प्रस्तावित प्रस्तांवाना सर्वसाधारण सभेची पुर्व मान्यता देणे आवश्यक आहे आणि,

ज्या अर्थी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ६, ६(अ) मधील तरतुदीनुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका नगरमंडळाची मुदत दि.१९ ऑगस्ट २०२३ रोजी संपुष्टात आलेली असल्याने सद्य:स्थितीत सर्वसाधारण सभा अस्तित्वात नाही, आणि,

ज्या अर्थी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाखाली सर्व अधिकारांचा वापर करण्यासाठी आणि तिची सर्व कामे व कर्तव्ये पार पाडण्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या प्रशासक पदी आयुक्त,सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका यांची दि.२४/०८/२०२३ रोजीचे मा.शासन आदेशान्वये नियुक्ती करण्यात आलेली आहे.

त्या अर्थी, सर्वसाधारण सभेच्या मान्यतेने पार पाडावयाचे कामकाज पुर्ण करण्यासाठी प्रशासक यांच्या अध्यक्षतेखाली **सोमवार दि.०९/१०/२०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता पद्मभूषण डॉ.वसंतरावदादा पाटील सभागृह मुख्यालय, सांगली** येथे सभा आयोजित केली आहे. सदर सभेमध्ये खालील परिशिष्ठातील विषय विचाराधीन आहेत. तरी सदर सभेस सर्व संबंधीत अधिकारी यांनी उपस्थित रहावे.

## परिशिष्ठ

१. मागील प्रशासक सभा दि.१८/०९/२०२३ रोजीचे कार्यवृत्त वाचून कायम करणे.

२. सन २०२३-२४ महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोयी सुविधांचा विकासासाठी विशेष तरतुद या योजनेंतर्गत सांगली येथील हनुमाननगर स.नं.३३४ या जागेमध्ये महानगरपालिकेचे नविन नाट्यगृहाचे बांधकाम करणे र.रु.२४,९८,८७,०९५/- मात्रचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी कार्यालय,सांगली यांचेकडे निधी मिळणेसाठी सादर करणेस मान्यता देणेकामी **उपायुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि.०५/१०/२०२३ चे विषयपत्र.**

३. पुणे-मिरज रेल्वे दुहेरीकरण प्रकल्पांतर्गत रेल्वे किमी २६९/९६७ मधील रेल्वे पुनर्बांधणी करणे अंतर्गत वाहतुकीच्या सोयीसाठी उड्डाणपुलाच्या दोन्ही बाजूस ६ मी. X ६ मी. मापाचे भूमिगत मार्ग (Subway) करणे कामी होणाऱ्या र.रु.४,३२,५५,५९७/- मात्रचा प्रस्ताव जिल्हा नियोजन समिती अंतर्गत महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजना अथवा इतर कोणत्याही योजनेमधून निधी मिळणेसाठी सादर करणेस मान्यता देणेकामी **उपायुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि.०६/१०/२०२३ चे विषयपत्र.**

४. महासभा ठराव क्र.२९१ दि.०२/०९/२०२२ च्या ठरावामधील मिटर नादुरुस्त असलेल्या पाणीपट्टी धारकांची दुप्पट दराने आकारणी करणेस मा.महासभा ठराव क्र.१८२ दि.३०/०३/२०२२ ने देण्यात आलेली मान्यता रद्द केली असून, त्यास पुनश्च मान्यता मिळणेबाबत **उपायुक्त (पाणी पुरवठा विभाग) यांचे दि.२१/०९/२०२३ चे विषयपत्र.**

मा.प्रशासक तथा आयुक्तसो यांचे मान्यतेने

**प्र.महापालिका सचिव,**
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका

# सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

## सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- ०२/२०२३-२४

**सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- ०६** **दिनांक :- ०९/१०/२०२३**

**विषय क्रमांक :- ०१**

---

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांचा वापर करुन,

मागील सर्वसाधारण प्रशासक सभा दि.१८/०९/२०२३ रोजीच्या कार्यवृत्तातील ठराव क्र. ०१ ते ठराव क्र. ०५ हे वाचून दाखविण्यात आले. सदरचे कार्यवृत्त वाचून सर्वानुमते कायम करणेत येत आहे.

(सुनिल पवार)
**प्रशासक तथा आयुक्त**
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महापालिका सचिव**
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

# <u>सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका</u>

## <u>सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- ०२/२०२३-२४</u>

**सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :-०७** **दिनांक :- ०९/१०/२०२३**

**विषय क्रमांक :- ०२**

---

सोबतचे उपायुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि.०५/१०/२०२३ चे विषयपत्राचे अवलोकन करणेत आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार **सर्वसाधारण** सभेच्या अधिकारांचा वापर करुन,

सन २०२३-२४ महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोयी सुविधांचा विकासासाठी विशेष तरतुद या योजनेंतर्गत सांगली येथील हनुमाननगर स.नं.३३४ या जागेमध्ये महानगरपालिकेचे नविन नाट्यगृहाचे बांधकाम करणे कामास र.रु.२५ कोटी मात्रचा निधी महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग,शासन निर्णय क्र.मनपा-२०२३/प्र.क्र.४५९/नवि-१६ दि.२८/०७/२०२३ अन्वये मंजुर झालेला असून, सदर कामासाठी वास्तुविशारद श्री.प्रमोद चौगुले यांचेकडून र.रु.२४,९८,८७,०९५/- मात्रचे अंदाजपत्रक व आराखडे तयार करुन घेणेत आलेले आहेत. त्यानुसार महापालिकेचे नविन नाट्यगृह बांधकाम करणेच्या प्रस्तावास मा.जिल्हाधिकारीसो यांचेकडून प्रशासकीय मान्यता मिळून निधी मंजूर होणेकामी प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी कार्यालय,सांगली यांचेकडे सादर करणेस मान्यता देणेत येत आहे.

(सुनिल पवार)
**प्रशासक तथा आयुक्त**
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महापालिका सचिव**
**सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका**

# सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

## सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- ०२/२०२३-२४

**सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :-** ०८ **दिनांक :- ०९/१०/२०२३**

**विषय क्रमांक :- ०३**

---

सोबतचे उपायुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि.०६/१०/२०२३ चे विषयपत्राचे अवलोकन करणेत आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांचा वापर करुन,

सांगली येथील पुणे- मिरज रेल्वे दुहेरीकरण प्रकल्पांतर्गत रेल्वे उड्डाण पुल क्र.५०३ ची पुनर्बांधणी सुरु आहे. सदर कामाच्या लगतच्या चिंतामणीनगर व कलानगर परिसरातील नागरिकांच्या वाहतुकीच्या सोईसाठी उड्डाण पुलाच्या दोन्ही बाजूस भूमिगत मार्ग करणेसाठी मा.पालकमंत्री महोदय यांचे निर्देशानुसार मा.जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये झालेल्या बैठकीमध्ये झालेल्या निर्णयानुसार उड्डाण पुलाच्या दोन्ही बाजूस ६ मी. X ६ मी. मापाचे भूमिगत मार्ग करणेसाठी उपमुख्य अभियंता (बांधकाम) मध्य रेल्वे,सातारा यांचेकडून र.रु.४,३२,५५,५९७/- मात्रचे खर्चाचे अंदाजपत्रक प्राप्त झालेले आहे. त्यानुसार सांगली येथील पुणे-मिरज रेल्वे दुहेरीकरण प्रकल्पांतर्गत रेल्वे किमी २६९/९६७ मधील रेल्वे पुनर्बांधणी करणे अंतर्गत वाहतुकीच्या सोयीसाठी उड्डाणपुलाच्या दोन्ही बाजूस ६ मी. X ६ मी. मापाचे भूमिगत मार्ग (Subway) करणे कामी होणाऱ्या र.रु.४,३२,५५,५९७/- मात्रचा प्रस्ताव जिल्हा नियोजन समिती अंतर्गत महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजना अथवा इतर कोणत्याही योजनेमधून निधी मिळणेसाठी जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली यांचेकडे सादर करणेस मान्यता देणेत येत आहे.

(सुनिल पवार)
**प्रशासक तथा आयुक्त**
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महापालिका सचिव**
**सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका**

# सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

## सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- ०२/२०२३-२४

**सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :-** ०९ **दिनांक :- ०९/१०/२०२३**

**विषय क्रमांक :- ०४**

---

सोबतचे उपायुक्त (पाणी पुरवठा विभाग) यांचे दि.२१/०९/२०२३ चे विषयपत्राचे अवलोकन करणेत आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांचा वापर करुन,

मा.महासभा ठराव क्र.१८२ दि.३०/०३/२०२२ अन्वये ज्या पाणी पट्टी धारकांची मिटर नादुरुस्त असतील त्यांना दुप्पट दराने पाणीपट्टी आकारणी करणेस मान्यमता देणेत आलेली होती.तथापि याबाबत नागरीकांचेकडून तक्रारी आल्याने मा.महासभा ठराव क्र.२९१ दि.०२/०९/२०२२ ने मान्यता रद्द केलेली होती.

सद्या महापालिका पाणी पुरवठा विभागाकडे ८८००० नळ कनेक्शन असून,त्यापैकी सरासरी ३०% नळधारकांना मिटर रिडींग प्रमाणे बिले दिली जातात व ७०% ग्राहकांना पाणी मिटर बंद असल्याने सरासरीप्रमाणे बिले दिली जात आहेत. त्यामुळे रिडींग प्रमाणे बिले दिली जाणाऱ्या नळ कनेक्शन धारकांमध्ये रोष निर्माण होत असून, चालू असलेले मिटर बंद पाडणेचे प्रकार निदर्शनास येत आहेत. त्यामुळे एक महिन्यापेक्षा जास्त काळ मिटर नादुरुस्त असल्यास अशा पाणी मिटर धारकांना मिटर दुरुस्त करुन सुव्यवस्थेत आणेपर्यत दुप्पट दराने पाणीपट्टी आकारणी करणेस तसेच ज्या अपार्टमेंटची पाणी मिटर बंद असतील त्यांना प्रत्येक सदनिकेनुसार बिल आकारणी करणेस मान्यता देणेत येत आहे.

तथापि, याकामी प्रशासनाने बंद असलेल्या मिटरबाबत वृत्तपत्रामध्ये जाहिर प्रसिद्धी देऊन, बंद असलेली पाणी मिटर महापालिकेकडून दुरुस्त करुन घेणेबाबत नागरिकांना जाहिर आवाहन करावे. तसेच, बंद मिटर दुरुस्त होत नसल्यास त्याठिकाणी ग्राहकांकडून त्यांचे स्वखर्चाने नविन पाणी मिटर बसवून घ्यावे. नविन पाणी मिटर महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांची मान्यता असलेल्या कंपनीचीच बसवावीत व या सर्व बाबींची पुर्तता करणेस दोन महिन्याची मुदत देणेत येत असून, पाणी पुरवठा विभागाने याबाबत तातडीने कार्यवाही सुरु करावी असे आदेशित करणेत येत आहे.

पाणी पुरवठा अभियंता

**महापालिका सचिव**
**सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका**

(सुनिल पवार)
**प्रशासक तथा आयुक्त**
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका